1609/01-06-18



झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/प्र.क्र.१७१/११८६/२०१८
दिनांक : ०१/०६/२०१८.

## "जाहिर नोटिस"

### ( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पुर्वसुचना )

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल झालेला आहे. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. झोपुप्रा/तांत्रिक/१८५९/२०१७ दि.२८/११/२०१७ नुसार "ज्या खाजगी जागेवरील झोपडपट्टया घोषित नाहीत, अशा झोपडपट्टयांच्या बाबतीत या कार्यालयाकडील आदेश क्र.२१५ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीबाबत अंतिम निर्णय घेतल्यानंतर, सदरचे क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३(क) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून प्रथम घोषित करणे आवश्यक राहील, सदरचा आदेश झाल्यानंतरच योजनेच्या अनुषंगाने प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहीर प्रकटन, पात्रता यादी (परिशिष्ट-२) व इतर अनुषंगिक कामे याबाबतची कार्यवाही करता येईल", अशी कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे सहमहापालिका आयुक्त परिमंडळ क्र. ४, पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल, त्यांचेकडील कार्यालयीन पत्र दि.२८/०९/२०१७ रोजी सादर केला आहे तसेच मान्य विकास आराखडा सन २०१७ नुसार खालील अनूसूचीमध्ये नमूद केलेले झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र हे निवासी (Residential) म्हणून समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व पुर्नविकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना, "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी,कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे,किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यांनतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील", असे नमूद केले आहे;

आणि ज्याअर्थी, या नोटीसव्दारे सोबत अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित आहे;

त्या अर्थी, या अनुसुचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत सादर करण्यास फर्माविण्यात येत आहे. अशा सुचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं.२९६/अ/१/४/२, हडपसर, शेवकर वस्ती, पुणे | ११७०.०० चौ. मी. | **पुर्वेस -** रस्ता व लागू स.नं. २९६ पैकी. | मे. यश प्रॉप्रर्टिज प्रमोटर्स अण्ड डेव्हलपर्स, कोंढवे-धावडे, एन डी ए रोड, पुणे २३ |
| | | **पश्चिमेस -** रस्ता (१२ मी. डि.पी. रस्ता) व लागू स.नं. १२१ | |
| | | **उत्तरेस -** रस्ता (१२ मी. डि.पी. रस्ता) | |
| | | **दक्षिणेस -** रस्ता (१८ मी. डि.पी. रस्ता) | |

सदरची नोटिस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

OK
3/3/15

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक - /०५/२०१८

प्रत :-१) श्री. शेखर बापूराव चिंधे व राहूल नथूराम धावडे , यश प्रॉप्रर्टिज तर्फे भागीदार (सामाईक क्षेत्र), कोंढवे-धावडे, एन डी ए रोड, पुणे २३

२) व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६ यांना राजपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

३) मे. यश प्रॉप्रर्टिज प्रमोटर्स अण्ड डेव्हलपर्स, कोंढवे-धावडे, एन डी ए रोड, पुणे २३.